# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.11.2025** **वार- बुधवार**

---

**निवडणूक**

पुणे विभागातल्या शिक्षक आणि पदवीधर मतदार संघातील मतदार नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार 10 डिसेंबर पर्यंत नाव नोंदवलेल्या अर्जांवर निर्णय घेऊन पात्र मतदारांचा समावेश 30 डिसेंबरच्या अंतिम मतदार यादीमध्ये करण्यात येणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार या मतदार याद्या नव्यानं तयार केल्या जात आहेत.

**त्रिभाषा धोरण**

राज्यातल्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समिती विविध घटकांशी संवाद साधत आहे. उद्या पुण्यात विधानभवन, कौन्सिल हॉल इथं सकाळी 10 वाजता या समितीचा जनसंवाद आयोजित करण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रातील अधिकाधिक घटकांनी यामधे सहभागी व्हावं, असं आवाहन विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी केलं आहे.

**शिबिर**

नोव्हेंबर महिन्यात देशभरात निवृत्ती वेतनधारकांसाठी डिजिटल हयात प्रमाणपत्र मोहीम राबवली जात आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, पुणे विभागा अंतर्गत विविध रेल्वे स्थानकांवर विशेष शिबिर आयोजित केलं जाणार आहे. या शिबिरांत रेल्वेच्या निवृत्ती वेतनधारकांना चेहरा अधिकृतता-आधारित डिजिटल हयात प्रमाणपत्र सेवा मोफत दिली जाईल. पुण्यात 14 आणि 26, तळेगाव इथं 13, दौंड आणि उरुळी इथं 19, चिंचवडला 21, आणि देहू रोड इथं 22 नोव्हेंबरला हे शिबिर आयोजित केलं जाणार आहे.

**अतिक्रमण**

पुण्यातील गंगाधाम चौकातून कात्रज कोंढवा रस्त्याकडे जाणाऱ्या बिबवेवाडीच्या डोंगर उतारावरील बेकायदा गोदामांवर पुणे महापालिकेनं कारवाई केली आहे. या कारवाईत 27 गोदामांची बांधकामं पाडण्यात आली. दोन वर्षांपुर्वी याठिकाणी लागलेल्या आगीच्या घटनेनंतर प्रशासनानं नोटीस देऊनही हे अतिक्रमण काढण्यात आलं नव्हतं.

**स्मार्टसिटी एक्स्पो**

स्पेनमधे बार्सिलोना इथं नुकत्याचं झालेल्या स्मार्ट सिटी एक्स्पो वर्ल्ड कॉंग्रेस मध्ये 'आंतरराष्ट्रीय शहरी आणि प्रादेशिक सहकार्य ग्लोबल थीमॅटिक नेटवर्किंग कार्यशाळेत' सहभागी होण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला आमंत्रित करण्यात आलं होतं. शहरी गतिशीलता, हवामान बदलास अनुरूप नियोजन, आणि शाश्वत वाहतूक या विषयांवरच्या चर्चासत्रांमध्ये महापालिकेच्या प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

**अभियान**

पुण्यातील भारतीय टपाल विभागानं दिवाळी फराळ परदेशात हे अभियान यशस्वीपणे राबवलं. या अभियाना अंतर्गत आंतरराष्ट्रीय पार्सलद्वारे परदेशात राहणाऱ्या आपल्या प्रियजनांना पारंपरिक दिवाळी फराळ पाठवण्यासाठी प्रोत्साहित करण्यात

आलं. तसंच माफक आंतरराष्ट्रीय पार्सल दर, मोफत पिकअप सुविधा, पोस्ट ऑफिसमध्ये पार्सल पॅकिंग अशा सोयीस्कर आणि ग्राहकाभिमुख सुविधा देण्यात आल्या.

**नेहरू**

माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त येत्या शुक्रवारी महाराष्ट्र गांधी स्मारक निधीतर्फे पुस्तक प्रकाशन आणि व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कोथरुडमधल्या गांधी भवन इथं होणाऱ्या या कार्यक्रमात पंडित नेहरूंनी लिहिलेल्या पुस्तकांवर आधारित व्याखानं होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांनी दिली.

**रंगयात्री**

पुणे महापालिकेच्या प्रस्तावित 'रंगयात्री' या ऑनलाईन आरक्षण सुविधेमध्ये त्रुटी जाणवत असल्यानं नाट्य निर्माते, नाट्य व्यवस्थापक आणि संयोजकांनी या ॲपला विरोध दर्शविला आहे. महापालिकेच्या या निर्णयाला विरोध करत बालगंधर्व रंगमंदिराच्या आवारात आज घंटानाद करून, घोषणा देत प्रशासनाचा निषेध करण्यात आला.

**मधुमेह**

कुपोषण किंवा अल्प पोषणामुळे मधुमेह होऊ शकतो का आणि त्याची कारणं तसंच उपचार याबाबत लॅन्सेट या वैद्यकीय विषयावरील नियतकालिकात एक शोधनिबंध प्रकाशित झाला आहे. पुण्यातल्या केईएम रुग्णालयातल्या मधुमेह विभागाचे प्रमुख डॉ. चित्तरंजन याज्ञिक यांचा या शोध निबंधाच्या लेखकांमध्ये समावेश आहे. या विषयावर अधिक संशोधन आणि दस्तऐवजीकरण होणं गरजेचं असल्याचं डॉ. याज्ञिक यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितलं.

**क्रीडा**

धायरी इथल्या धारेश्वर विद्या आणि क्रीडा प्रतिष्ठान संस्थेतील विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये सुवर्ण कामगिरी केली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 30 तर किमान तापमान 13 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान असेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**